'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 171 (H)- History
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

# विदर्भातील आदिवासींचे वैभवशाली पण दुर्लक्षित लोकसाहित्य - एक मागोवा

**प्रा.संदीप नन्नावरे ,**
सहाय्यक प्रध्यापक
महात्मा फुले महाविद्यालय,पिंपरी,पुणे-१७
मो.नो. ८६०५९७०७७०
SNANNAWARE98@GMAIL.COM

विदर्भातीलनऊ आणि पश्चिममहाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये कमी जास्त प्रमाणात आदिवासीची वस्ती असली तरी काही जिल्ह्यात ते जास्तमोठय़ा प्रमाणात आढळतात. प्रमुख्याने गडचिरोली हा जिल्हा आदिवासी जनसंख्येच्या दृष्टीने मोठा म्हणून प्रसिद्ध असून सांस्कृतिककरण्याच्या फारचखालच्या स्तरात असलेला. म्हणून अतिमागास असलेली माडिया-गोंड हि जमात याच जिल्ह्यात सापडते.त्यानंतर चंद्रपूर, यवतमाळ,अमरावती या जिल्ह्यांमध्ये आणि नंतर नागपूर व इतर जिल्ह्यांमध्ये आदिम जमाती मोठय़ा प्रमाणात आढळतात.विविध आदिम जमाती विखुरलेल्या असल्या तरी त्यात गोंड,परधान कोलाम,माना,हलबा या आदिम जमाती मोठया प्रमाणात आढळतात.त्यांच्यातील सांस्कृतीकरणही भिन्न स्तराला असले तरी इतर समाजापेक्षा ते कमी स्तराला आहे.१

आदिवासी संस्कृतीही पुरातन,अभिजात आणि समृद्ध संस्कृती आहे.आम्हा सर्वांच्या पूर्वइतिहासतील अनेक प्रथापपरांचे जतन अजूनही त्यांनी केलेले आहे व त्या संस्कृतीचे जतन आणि अभिव्यक्ती ही प्रामुख्याने आदिवासींच्या लोकसाहित्यातून झालेली आहे.त्यांच्या लोकगीते आणि लोककथांमधून ते प्रगट होते.मौखिक पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला ते हस्तांतरित होत जाते. नृत्याच्या वेळी गाहील्या जाणाऱ्या गीतांमधून त्यांचा उच्चार होतो. जन्म,विवाह,मृत्यू,सण,उत्सव यावेळीपाहुण्याचे स्वागत आणि धार्मिक विधी इत्यादी प्रसंगाचा किती बोजा नृत्य पाहुण्यांचे स्वागत आणि धार्मिक विधी इत्यादी प्रसंगी अशी गीते बहुधा नृत्यासह गाण्यात येतात.२विकास कार्यक्रमात आणि शिक्षणाचा प्रसार यातून आदिवासांची स्थितीबदलतअसून त्यांच्या आधुनिकरणाची प्रक्रिया वेगाने होत आहे. ही जरी स्वागतार्ह बाब असली तरी एक विपरीत बाबम्हणजे अनेक शिकलेली मुले आपल्या आदिम बांधवांना व त्यांनी जपलेल्या संस्कृतीला विसरत चालली आहेत.कदाचित भविष्यात जुनी पिढी नामशेष झाल्यावरआदिम लोकसाहित्याचा वारसा उपलब्ध होणार नाही बोलीच्याच स्वरूपात असलेल्या आदिमांच्या लोकसाहित्याला शब्दांकित करून ठेवण्यासाठी हाउद्देश प्रासंगिक सुरवात तुरळक लोकसाहित्य प्रकाशित होतअसले तरी संकलित संशोधित व सांस्कृतिक संदर्भासह ते मांडण्याचा हा प्रयत्न आहे.३

गोड,परधान, केलाम मानाया पाच प्रमुख आदिम जमातींचाही लोकसाहित्याचा आस्वाद वाचकांना देणे. खरं तर माणूस बोलायला आधी लागला लिहिण त्याला शिकवं लागल. आपली पुरातन संस्कृती सांस्कृतिक ठेवा, समाजाची ठेवण,चालीरीती,प्रथा-परंपरायांना लिखित स्वरूप मिळवण्यासाठी शतक जावी लागली.पण हा मौखिक ठेवा हजारो वर्षापासून आदिवासींनी जपून ठेवला आहे.४

आदिवासी म्हणजे लोकसमाजाचाप्राचीनतभाग.त्यांच्याप्राचीन परंपरा विविधचालीरीती,त्यांची भाषा,रंगीबेरंगी पोशाख,सामुदायिक जीवन,सुखदुःखातील सामुदायिक सहभाग आणि बहुरंगीउत्सव सणातील नैसर्गिक आणि परिपूर्ण आनंद या सर्वच गोष्टी मनाला अतिशय स्पर्श करणाऱ्या आहेत.

बहुतांश आदिवासी जमातीचे लोकसाहित्य हे 'श्रुत' स्वरूपाचे असते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक हस्तांतरण होत असते.त्याचे कारण त्यांची आदिवासींची भाषा ही बोलीभाषा आहे.त्यांना लिपी नाही.लोकसाहित्य लोककथा, लोकगीते, पौराणिक तसेच एतेहासिक कथा,लोककथागीते, म्हणी या सर्वांचा समावेश असतो. या सर्व प्रकारांना परंपरागत वारसा असतो. तसेच त्यांना स्वतःचा ताल असतो.५

आदिवासींच्या लोकसाहित्य निर्मितीची प्रेरणा प्रामुख्याने निसर्ग असतो. नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव तसेच घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा नाद,स्वर त्याच्या दैनदिन जीवनाचा भाग असतो. तोच नैसर्गिक प्रभाव त्यांच्या

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17